**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७, मुंबई.**
पुरुषोत्तम खेराज बिल्डींग, पहिला मजला,
नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड (प), मुंबई - ४०० ०८०.
दुरध्वनी क्रमांक :०२२-२५६४५२२८.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक : २५/०५/२०२३

# प्रेसनोट

## घाटकोपर पोलीस ठाणेकडून “ चोरीस गेलेले तसेच हरविलेले १५० मोबाईल हस्तगत करुन मूळ मालकांना परत केल्याबाबत ”

घाटकोपर पोलीस ठाणे येथे चोरीस गेलेले मोबाईल व हरविलेले/गहाळ झालेले मोबाईलचा शोध घेण्याकरीता विशेष पथकाची नेमणुक करण्यात आलेली होती.

नमुद विशेष पथकाने वरिष्ठांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाखाली सदर मोबाईलबाबत गोपनिय माहिती काढुन मानवीय कौशल्याचा वापर करून जानेवारी २०२३ पासुन चोरीस गेलेले, हरविलेले/गहाळ झालेले असे एकुण १५० मोबाईल हस्तगत केले.

आज दिनांक २५/०५/२०२३ रोजी मा. श्री. विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. पुरुषोत्तम कराड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-७, मुंबई, श्री. संजय डहाके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई यांच्या उपस्थितीत सदर १५० मोबाईलचे मुळ मालकांना परत करण्यात आले.

सदरची उत्कृष्ट कामगिरी मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. सत्य नारायण चौधरी, सह पोलीस आयुक्त (का.व सु), बृहन्मुंबई, मा. श्री. विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई व श्री. पुरुषोत्तम कराड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-७, मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री. दिपक कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त, घाटकोपर विभाग, मुंबई यांच्या देखरेखीखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय डहाके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. प्रमोद कोकाटे, विशेष पथक अधिकारी पोउपनि पद्माकर पाटील, पो.ह.क्र./०५००८२, अर्जुन मस्के, पो.शि.क्र./०९.१०१२, अमोल सुर्यवंशी, पो.शि.क्र./०९. १०१४, अजय अहिरे, पो.शि.क्र./ ९३००५, कुलदीप सुरवाडे, पो.शि.क्र./१११०६६, जगदीश मोरघे, तसेच परिमंडळ कार्यालयातील म.पो.शि.क्र./०९.१२१४, रुपाली हाडवळे यांनी केली आहे.

-----०००-----